# कोहलीची जागा घेण्यासाठी श्रेयस हा नंबर-१ दावेदार

**मुंबई–** विराट कोहलीने त्याच्या इंस्टा हँडलवरून कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. तो संघात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करतो आणि संघातील सर्वात अनुभवी सदस्य आहे. त्याच्या जाण्याने संघात एका अनुभवी आणि मजबूत मधल्या फळीतील फलंदाजासाठी मोठी पोकळी निर्माण होईल. या पदासाठी ५ उमेदवार रिंगणात आहेत.

**श्रेयस अय्यर:** भारतासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये पदार्पण करणारा श्रेयस कसोटीत कोहलीची जागा घेण्यासाठी नंबर-१ चा दावेदार आहे. त्याने एकदिवसीय संघात आपले स्थान निश्चित केले आहे परंतु सध्या कसोटीतील खराब कामगिरीमुळे तो बाहेर आहे. त्याने १४ कसोटी सामन्यांमध्ये १ शतक आणि ५ अर्धशतके झळकावली आहेत. श्रेयसच्या नावावर १५ प्रथम श्रेणी शतके आहेत.

**रजत पाटीदार:** इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या कसोटी मालिकेत पाटीदारने कोहलीची जागा घेतली होती. त्यानंतर वैयक्तिक कारणांमुळे विराट मालिका खेळू शकला नाही. तथापि, पाटीदारला ३ सामन्यांत एकही अर्धशतक करता आले नाही. देशांतर्गत क्रिकेटमधील त्याच्या कामगिरीचा विचार करता, तो पुन्हा एकदा इंग्लंड मालिकेसाठी संघात स्थान मिळवू शकतो. रजतच्या नावावर १३ प्रथम श्रेणी शतके आहेत.

**सरफराज खान:** गेल्या वर्षी भारतासाठी कसोटी पदार्पण करणाऱ्या सरफराजने १ शतक आणि ३ अर्धशतके झळकावली आहेत. तथापि, ऑस्ट्रेलिया दौऱ्यात त्याला एकाही सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नाही. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सरफराजची सरासरी ६५.६१ आहे. त्याला देशांतर्गत खेळपट्ट्यांचा तज्ज्ञ मानले जाते, त्यामुळे परदेशी परिस्थितीत कोहलीची जागा घेणे त्याच्यासाठी कठीण आहे.

**ध्रुव जुरेल:** २४ वर्षीय जुरेलने भारतासाठी ४ कसोटी सामने खेळले आहेत. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात त्याने आपल्या तंत्राने निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले. तरुण जुरेल विकेटकीपिंग देखील करतो, त्यामुळे त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट करण्यासाठी अधिक पर्याय उपलब्ध होतात. इंग्लंड दौऱ्यासाठी व्यवस्थापन त्याच्यामध्ये गुंतवणूक करू शकते.

**करुण नायर:** देशांतर्गत क्रिकेटच्या गेल्या हंगामात आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या करुणला इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभवही आहे. कोहलीच्या जागी तो एक चांगला पर्याय आहे. घरच्या मैदानावर भारतासाठी त्रिशतक झळकावण्याव्यतिरिक्त, त्याने २३ प्रथम श्रेणी शतके देखील झळकावली आहेत.

**रोहितची जागा कोण घेऊ शकेल?**

रोहित शर्माने ७ मे रोजी कसोटीतून निवृत्ती घेतली. तो गेल्या ६ वर्षांपासून रेड बॉल क्रिकेटमध्ये ओपनिंग करत आहे. सलामीच्या जागी केएल राहुल त्याची कायमची जागा घेऊ शकतो. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर यशस्वी जैस्वालसोबत ज्याने सलामी दिली. शुभमनही सलामीला परतू शकतो. याशिवाय, रोहितची जागा घेण्यासाठी आणखी चार तरुण खेळाडू दावेदार आहेत.

**साई सुदर्शन:** २३ वर्षीय सुदर्शन आयपीएलमधील कामगिरीनंतर चर्चेत आहे. त्याने भारतासाठी ३ एकदिवसीय आणि १ टी-२० सामना खेळला आहे. त्याचे तंत्र आणि कौशल्य पाहून रवी शास्त्री सारख्या तज्ज्ञांनी त्याला कसोटी संघासाठी योग्य घोषित केले आहे. सुदर्शनने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ७ शतके झळकावली आहेत आणि त्याला इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेटचाही अनुभव आहे.

**देवदत्त पडिकल :** २४ वर्षीय पडिकलला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर संधी मिळाली. त्याने नवीन चेंडूवर उत्तम फलंदाजी केली. २ कसोटींव्यतिरिक्त, त्याने २ टी-२० सामने देखील खेळले आहेत. तो नियमितपणे भारत-अ संघासाठी प्रथम श्रेणी सामने खेळतो. त्याने या फॉरमॅटमध्ये ६ शतके झळकावत २८१५ धावा केल्या आहेत.

**अभिमन्यू ईश्वरन:** रोहित ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पहिला सामना खेळू शकला नाही, त्याच्या जागी ईश्वरनला संघात संधी मिळाली. त्याने अद्याप भारताकडून पदार्पण केलेले नाही परंतु १०१ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये त्याने २७ शतके झळकावली आहेत.

**ऋतुराज गायकवाड:** पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये भारतासाठी पदार्पण करणारा गायकवाड देखील रोहितची जागा घेण्यासाठी उमेदवार आहे. तथापि, तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये लाल चेंडूपेक्षा पांढऱ्या चेंडूला प्राधान्य देतो. त्याला संघात घेण्याबाबत विचार केला जातो की नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. गायकवाडच्या नावावर ७ प्रथम श्रेणी शतके आहेत.

**जडेजा हा एकमेव अनुभवी खेळाडू उरला**

रोहित आणि कोहलीनंतर, रवींद्र जडेजा हा कसोटी संघात उरलेला एकमेव वरिष्ठ खेळाडू असेल, ज्याची कारकीर्द १२ वर्षांहून अधिक आहे. जर जडेजा १-२ वर्षात या फॉरमॅटमधून निवृत्त झाला नाही तर तोही चेतेश्वर पुजारा आणि अजिंक्य रहाणेप्रमाणे बाजूला होईल असे मानले जाते. निवृत्तीपूर्वी संघातून वगळण्यात आलेल्या खेळाडूंमध्ये इशांत शर्मा, उमेश यादव आणि वृद्धिमान साहा हे देखील होते. टीम इंडियाने तरुण खेळाडूंमध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे. अशा परिस्थितीत, नंबर-१ कसोटी अष्टपैलू खेळाडू देखील अडचणीत येऊ शकतो.

पान १ वरुन

## सहकार कायद्यात बदल करण्यासाठी समिती नेमणार

संस्थांना प्रशिक्षण देऊन त्यांचे 'बिजनेस मॉडेल' बनविण्यात येत आहे. या कामासाठी जागतिक बँकेनेही समाधान व्यक्त केले असून यातून 'ॲग्री बिजनेस'ची नवीन सुरुवात करण्यात आली आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

सहकारी साखर कारखाने साखर उत्पादनासोबत उपपदार्थही बनवीत आहेत. यामुळे जागतिक स्पर्धेत साखर कारखाने टिकत आहेत. केंद्राने किमान आधारभूत किंमत, इथेनॉल धोरण यामध्ये सातत्याने बदल केले आहेत. शेतकऱ्यांचे कारखाने शेतकऱ्यांकडेच राहील, अशी राज्य सरकारची भूमिका आहे. त्यामुळे साखर कारखान्यांनी उपपदार्थांच्या निर्मितीकडेही वळले पाहिजे. सहकारी तत्त्वावर सुरू असलेल्या सूतगिरण्यांना विजेचे दर हे जागतिक स्पर्धेत टिकविण्यासाठी अडचणीचे ठरत असल्याच्या तक्रारी असतात. सरकार विजेबाबत अनुदानही देत असते. त्यामुळे सर्व सूतगिरण्या सौरऊर्जेवर नेण्यात येत आहे. त्यामुळे सुतगिरण्यांची विजेची सर्वात मोठी अडचण दूर होणार असल्याचे फडणवीस म्हणाले.

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योगांनाही मदत करण्यात यावी. एकूण सहकारी संस्थांपैकी ५० टक्के या सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. सहकार कायद्यात बदल करून मागील काळात सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी वेगळे प्रकरण ठेवण्यात आले आहे. यामधून सहकारी गृहनिर्माण संस्थांची व्यवस्था उभारण्यात येत आहे. स्वयं पुनर्विकास करण्यासाठी नवीन योजना सहकारी संस्थांसाठी आणलेली आहे. त्यांना राज्य सरकार १७ प्रकारच्या वेगवेगळ्या सवलती देत आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बळकटीकरणामुळे मुंबईतच हक्काचे घर नागरिकांना मिळत आहे. आमदार प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयं पुनर्विकास बाबत समितीही स्थापन करण्यात आलेली आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

**भारताच्या वाटचालीमध्ये सहकाराचा मोठा वाटा– शिंदे**

भारत वेगाने तिसऱ्या महासत्तेकडे वाटचाल करीत आहे. सध्या जगातील सर्वात मोठी पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. महासत्तेकडे होणाऱ्या या वाटचालीत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा असणार आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

केंद्रात सहकार मंत्रालय स्थापन केल्यानंतर देशात सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुधारणांचे वारे वाहू लागले आहेत. नाबार्डच्या सहकार्याने ग्रामीण भागात ग्रामीण मार्ट स्थापन करण्यात येत आहे. किसान क्रेडिट कार्ड आणि मायक्रो एटीएममुळे सहकार चळवळीला अधिक बळकटी प्राप्त झाली आहे. ग्रामीण अर्थकारणाला मोठ्या प्रमाणावर यामुळे चालना मिळत आहे. महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक ही ६२ हजार कोटींचा व्यवहार असणारी देशात सहकार क्षेत्रात आर्थिक संपन्न असणारी बँक आहे. या परिसंवादाच्या विचार मंथनातून नक्कीच सर्वसामान्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी सहकार क्षेत्र किती महत्त्वाचे आहे, याबाबतीत विचार मिळणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**सहकार चळवळीच्या इतिहासावर अहवाल तयार करावा –अजित पवार**

पुणे जिल्ह्यातील सुप्याच्या भूमीत दीडशे वर्षांपूर्वी सावकारी विरोधात उठाव झाला. हा उठावच मुळात सहकार क्षेत्राचा श्रीगणेशा करणारा ठरला. आज सहकार चळवळ खूप पुढे गेली आहे. मात्र भविष्यातील संकट आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी या चळवळीला अधिक बळकट करण्याची गरज आहे. सहकार चळवळीच्या आतापर्यंतच्या इतिहासावर महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव बँकेने एक अहवाल तयार करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

लागोपाठ ६०० कोटींपेक्षा जास्त नफा कमवणारी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक ही सहकार क्षेत्रातील एकमेव बँक आहे. यंदा ६५१ कोटीचा नफा बँकेला मिळाला आहे. सहकारी बँकेला नफा झाल्यास संचालक मंडळांना काही प्रमाणात नफ्यातील हिस्सा देण्याच्या तरतुदीसोबतच बँक अडचणीत असताना संचालक मंडळावर कारवाई करण्याची तरतूदही करण्यात यावी. सहकारी संस्थांना व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात यावे. राज्य सरकार नेहमी सहकारी चळवळीच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

**सहकार कायद्याचा सुवर्णमध्य साधून नवीन कायदा आणावा– नितीन गडकरी**

सध्या सहकार चळवळ देशात केवळ महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, केरळ आणि इतर काही प्रांतांमध्ये आहे. ही चळवळ देशभर रुजविण्यासाठी केंद्र सरकारने नवीन सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून काम सुरू केले आहे. महाराष्ट्रात सध्या अस्तित्वात असले कंपनी कायदा, सहकार क्षेत्रातील कायदा यांचा सुवर्णमध्य साधून एक नवीन कायदा आणावा, असे आवाहन नितीन गडकरी यांनी यावेळी केले.

सहकार चळवळीच्या माध्यमातून अनेक कष्टकरी, गरीब आणि आर्थिक दुर्बल घटकांच्या आयुष्यात सकारात्मकता निर्माण झाली आहे. आर्थिक दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सहकार क्षेत्राने मोठे काम केले आहे. या सामाजिक, आर्थिक परिणामांचा निश्चितच महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेट बँकेने अभ्यास करावा. सर्वसामान्यांचे कष्टप्रत आयुष्य सुसह्य करण्यासाठी सहकार क्षेत्राने काम करावे. दुग्ध व्यवसायाच्या क्षेत्रात सहकार चळवळीने मोठे योगदान दिले आहे. यामुळे निश्चितच शेतकऱ्यांच्या आयुष्यात आर्थिक संपन्नता आली आहे, अशा शब्दात गडकरी यांनी सहकार चळवळीचे कौतुक केले.

**सावकारी व्यवस्थेला पर्याय म्हणून सहकार चळवळीचा जन्म– शरद पवार**

पुणे जिल्ह्यातील सुपा येथे झालेला हा उठाव सावकारी व्यवस्थेला पर्याय म्हणून सहकार चळवळीचा जन्मदाता ठरला. सावकारी पाशातून होत असलेल्या शोषणाने तेव्हा शेतकरी, गरीब हतबल झाले होते. अशा सर्व शोषणातून मुक्त करण्यासाठी सावकारविरोधात मोठा उठाव झाला. या उठावामुळेच सहकार चळवळ सुरू झाली, असे प्रतिपादन शरद पवार यांनी यावेळी केले.

राज्य सहकारी बँकेने त्याकाळी सुरू केलेल्या योजना आजही सुरू आहेत. राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आयुष्यात संपन्नता आणण्याचे काम अव्याहतपणे सुरू आहे. बँकेच्या आर्थिक सक्षमीकरणाची चर्चा देशभर असते. सध्या सहकारी संस्थांना ऊर्जितावस्था आणण्याची गरज आहे. यासाठी निश्चितच काम झाले पाहिजे, असेही शरद पवार यावेळी म्हणाले.

प्रास्ताविक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केले तर आभार दिलीप दिघे यांनी मानले. कार्यक्रमादरम्यान बँकेच्या आर्थिक ताळेबंदाच्या पुस्तिकेच्या प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ मान्यवर उपस्थित होते.

## भारत-पाक युद्धविरामानंतर शेअर बाजारात सुपर मंडे!

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीमुळे बाजारात तेजी आल्याचं सांगितलं जातंय. या तेजीमागे परदेशी गुंतवणूकदारांकडून होणारी खरेदी हे एक प्रमुख कारण आहे. देशाच्या जीडीपी आणि उत्पन्नात सुधारणा होण्याची अपेक्षा, चलनवाढ आणि व्याजदर यांसारख्या देशांतर्गत मॅक्रो निर्देशांकात घट ही बाजारातील गती पुनरुज्जीवित होण्याची चिन्हे आहेत.

आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, बजाज फायनान्स, आरआयएल, एल अँड टी, भारती, अल्ट्राटेक, एम अँड एम आणि आयशर या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक मोठ्या प्रमाणात केली जात आहे.

## नवीन संच मान्यतेमुळे ४०० शिक्षक अतिरिक्त

असणाऱ्या प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांबाबत अद्याप ग्रामविकास विभागाकडून आदेश निघालेले नाहीत. नगर जिल्ह्यात ११ हजारांहून अधिक शिक्षक सध्या कार्यरत असून या शिक्षकांच्या पदस्थापनेसाठी संचमान्यतेचे सुधारीत आदेश काढण्यात आलेले आहेत. यात आता ७५ विद्यार्थ्यांच्या पट संख्येवर शिक्षकांचे पद मंजूर करण्यात आले आहे. पूर्वी शिक्षकांच्या एका पदासाठी ६० विद्यार्थ्यांची अट होती. शिक्षकांच्या संच मान्यतेच्या सुधारीत आदेशामुळे एकट्या नगर जिल्ह्यात ४०० हून अधिक शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. जिल्ह्यातील संचमान्यता जवळपास अंतिम झाली असून लवकरती जाहीर करण्यात येणार आहे. दरम्यान, शिक्षकांच्या बदल्याची प्रक्रिया पूर्ण करण्यापूर्वी शालेय शिक्षण विभागाने बदली पात्र शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेनुसार शिक्षकांची यादी तयार करून ठेवलेली आहे. यात संबंधित शिक्षबकांनी स्वत:ची प्रोफाईल अपडेट करून ठेवलेली आहे. ग्रामविकास विभागाच्यावतीने आदेश निघताच बदल्यांसाठी वेळापत्रकानूसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

**दोन वर्षापासून प्रतिक्षा**

मागील वर्षी लोकसभा निवडणूक आणि त्यापूर्वी ऑनलाईन बदल्यासाठी तयारी यामुळे दोन वर्षापासून प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या झालेल्या नव्हत्या. गेल्या काही महिन्यांपूर्वी आंतरजिल्हा शिक्षकांना नेमणूका देण्यात आलेल्या होत्या. यासह न्यायालयाच्या आदेशानूसार काही शिक्षकांची सोय करण्यात आली. मात्र, दोन वर्षापासून शिक्षकांच्या जनरल बदल्याची प्रक्रिया झालेली नसल्याने मोठ्या संख्याने शिक्षकांची बदल्यांची प्रक्रियेकडे नजरा लागल्या आहेत.

## पाकिस्तानशी चर्चा झाली तर ती दहशतवाद, पीओकेवरच होईल

दहशतवाद्यांना निरोप देण्यासाठी जमले होते. हा पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा मोठा पुरावा आहे. भारत आणि आपल्या नागरिकांना कोणत्याही धोक्यापासून वाचवण्यासाठी आम्ही निर्णायक पावले उचलत राहू, असेही मोदी म्हणाले.

**नवीन युगातील युद्धात श्रेष्ठता सिद्ध केली**

पंतप्रधान म्हणाले की, आम्ही युद्धभूमीवर प्रत्येक वेळी पाकिस्तानला पराभूत केले आहे आणि यावेळी ऑपरेशन सिंदूरने एक नवीन आयाम जोडला आहे. आम्ही वाळवंट आणि पर्वतांमध्ये आमच्या क्षमता चमकदारपणे प्रदर्शित केल्या आहेत. आम्ही नवीन युगातील युद्धात देखील आमची श्रेष्ठता सिद्ध केली आहे. या ऑपरेशन दरम्यान आमच्या मेड इन इंडिया शस्त्रांची प्रामाणिकता सिद्ध झाली. आज जग पाहत आहे की २१ व्या शतकातील युद्धात मेड इन इंडिया संरक्षण उपकरणांची वेळ आली आहे.

**आपली एकता ही आपली सर्वात मोठी ताकद**

पंतप्रधान म्हणाले की, दहशतवादाविरुद्धची आपली एकता ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. हा निश्चितच युद्धाचा काळ नाही, पण दहशतवादाचाही काळ नाही. दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलता ही एका चांगल्या जगाची हमी आहे. ज्या प्रकारे पाकिस्तानी सैन्य आणि पाकिस्तानी सरकार दहशतवादाला पोसत आहेत, ते एके दिवशी पाकिस्तानलाच नष्ट करेल. जर पाकिस्तानला टिकून राहायचे असेल तर त्याला त्याचे दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट करावी लागेल. याशिवाय, शांततेचा दुसरा कोणताही मार्ग नाही. भारताचे मत अगदी स्पष्ट आहे, दहशतवाद आणि चर्चा एकत्र चालू शकत नाहीत. दहशतवाद आणि व्यापार एकत्र जाऊ शकत नाहीत आणि पाणी आणि रक्तही एकत्र वाहू शकत नाहीत, असेही मोदी म्हणाले.

## दहावीचा आज ऑनलाईन निकाल

मंडळातर्फे कळविण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ दरम्यान दहावीच्या परीक्षा घेतल्या. या परिक्षेला राज्यातील जवळपास १६.११लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यामध्ये ८.६ लाख मुले, ७.४७ लाख मुली आणि १९ट्रान्सजेंडर उमेदवारांचा समावेश होता. दहवीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, उमेदवार mahresult.nic.in वर त्यांचे लॉगिन क्रेडेन्शियल्स, म्हणजेच रोल नंबर आणि आईचे पहिले नाव वापरून ऑनलाइन निकाल तपासू शकतात. विद्यार्थी त्यांच्या विषयानुसार मिळालेले गुण या पाहू शकतात. तसेच, निकालाची प्रिंट आऊट देखील काढू शकतात. शाळांना त्यांचा एकत्रित निकाल in school login या वेबसाईटवर दिसेल. या वेबसाईटवर शाळांसाठी सांख्यिकीय माहिती देखील उपलब्ध असेल.

**विद्यार्थ्यांसाठी मंडळाने केलेल्या सूचना**

१) ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांची पडताळणी करायची आहे किंवा उत्तरपत्रिकांची झेरॉक्स कॉपीहवी आहे, ते त्यासाठी अर्ज करू शकतात. तसेच, ज्यांना पेपर पुन्हा तपासायचा आहे, म्हणजेच पुनर्मूल्यांकन करायचे आहे, ते देखील अर्ज करू शकतात. अर्ज करण्याची प्रक्रिया ऑनलाईन आहे आणि ती मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. गुणपडताळणी आणि छायाप्रतीसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख २८ मे २०२५ आहे. अर्ज भरताना Debit Card/ Credit Card/UPI/ Net Banking चा वापर करून शुल्क भरता येईल.

२) उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी एक अट आहे. फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्द्तीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. म्हणजे, ज्या विद्यार्थ्यांना पेपर पुन्हा तपासण्याची इच्छा आहे, त्यांना आधी उत्तरपत्रिकेची झेरॉक्स कॉपी घ्यावी लागेल. ती मिळाल्यानंतर ५ दिवसांच्या आत पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करावा लागेल. अधिक माहितीसाठी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) जे विद्यार्थी सर्व विषयात पास झाले आहेत, त्यांच्यासाठी गुण सुधारण्याची संधी आहे. फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या तीन संधी (जून-जुलै २०२५, फेब्रु.-मार्च २०२६ व जून-जुलै २०२६) श्रेणी/ गुणसुधार योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील. याचा अर्थ, जे विद्यार्थी आपले गुण वाढवू इच्छितात, ते पुढील तीन परीक्षांमध्ये (जून-जुलै २०२५, फेब्रुवारी-मार्च २०२६ आणि जून-जुलै २०२६) पुन्हा परीक्षा देऊ शकतात.

४) ज्या विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षा द्यायची आहे, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया १५ मे २०२५ पासून सुरु होईल. जून-जुलै २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार व खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार दिनांक १५/०५/२०२५ पासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन घेण्यात येणार आहेत. या परीक्षेसाठी कोण अर्ज करू शकतं, याबद्दलची माहिती लवकरच जाहीर केली जाईल.

## जिल्ह्यात सर्वदूर अवकाळी पावसाचा तडाखा

रोजी पावसाचा ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे.

दरम्यान यापूर्वीच हवामान खात्याने नगर जिल्ह्यात १४ तारखेपर्यंत वादळी वाऱ्यासह अवकळी बरसणार असल्याचा इशारा देत पावसाचा येलो अलर्ट दिलेला होता. जिल्ह्यात मागील महिन्यात तीन दिवस सहा ते सात तालुक्यात अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यानंतर मागील आठवड्यात राहुरी आणि पारनेर तालुक्यासह नगर, पाथर्डीच्या काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. यावेळी झालेल्या वादळात शेतकऱ्यांचे विविध पिकांचे नुकसान झालेले होते. हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा वाढवल्याने शेतकऱ्यांच्या मनात धडकी भरली आहे.

रविवारी जिल्ह्यात सांयकाळच्या वेळी विविध भागात वादळ झाले असून यात काही प्रमाणात नुकसान झालेले असले तरी जिवित अथवा वित्तीयहानी झालेली नव्हती. अवकाळी पावसामुळे नगरकरांना उन्हापासून दिलासा मिळाला असून आठ दिवसांपासून दिवभर उन्ह सावलीचा खेळ सुरू आहे. वातावरणात झालेल्या बदलामुळे गारवा वाढला आहे.

## वेळेआधीच मान्सून अंदमान-निकोबारमध्ये

प्रवास जलद होत आहे.

गेल्या पाच वर्षांमध्ये मान्सूनचे आगमन अंदाजित तारखेनंतर चार दिवसांनी किंवा त्यापूर्वी एक-दोन दिवसांनी झाले आहे. मात्र, यंदा मान्सून केरळमध्ये पाच दिवस आधी म्हणजेच २७ मे रोजीच केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. सामान्यतः १ जून हा केरळमधील मान्सून आगमनाचा दिवस मानला जातो, परंतु यंदा अनुकूल हवामान परिस्थितीमुळे तो लवकर पोहोचेल.

## अंगावर वीज पडल्याने तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

गणेश शिवाजी काळे (वय ३४) या शेतकऱ्याचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला.

या घटनास्थळी कामगारांसह आणखी १० ते १५ शेतकरी देखील उपस्थित होते. या घटनेनंतर आणखी एक शेतकरी रामदास गोरक्षनाथ काळे (वय ४५) या शेतकऱ्याचा रक्तदाब वाढल्याने त्रास होत होता. त्यांना पुढील उपचारासाठी पाचेगाव येथील खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले.

गणेश काळे यांना आधी पाचेगाव येथील खासगी दवाखान्यात आणले असता डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी नेवासा फाटा येथील रुग्णालयात पाठविण्याचा सल्ला दिला. पण नेवासा येथील डॉक्टरांनी गणेश याला मृत घोषित केले. त्याचा मृतदेह नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. आज मंगळवारी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

गणेश यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, भाऊ, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. गणेश याची ओळख शांत स्वभावाचा असल्याने तो परिसरात परिचित होता. त्याच्या अपघाती निधनाने परिसरात शोकाकुल वातावरण निर्माण झाले.

## पाथर्डीत गारपीट, अवकाळीचा दणका; दोन जनावरे दगावली

सायंकाळी दैत्यनांदूर व सोनोशी परिसरात अचानक वातावरण ढगाळ होऊन वादळी वाऱ्यासह गारपिटीचा जोरदार पाऊस झाला. यावेळी अनेक ठिकाणी झाडे कोसळली, विद्युत खांब वाकले आणि वाहतुकीला अडथळे निर्माण झाला. रविवारी दैत्यनांदूर येथे एक व सोनोशी येथे तीन घरांची पडझड झाली असून गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोमवारी पुन्हा पाथर्डी तालुक्यातील वातावरणाने पलटी घेतली. दुपारी विजेच्या कडकडाटासह, भीतीदायक आवाजात वीज कोसळली. तिनखडी येथे एका बैलाचा, तर माणिकदौंडी येथे एका म्हशीचा वीज पडून मृत्यू झाला. पाथर्डी शहरातील लोणार गल्ली येथे वीज कोसळली. मात्र कोणतीही जीवितहानी झाली नाही.या दरम्यान सोमवारी कोरडगाव, जिरेवाडी, दैत्यनांदूर परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आला. कोरडगावहून बोधेगावकडे जाणाऱ्या नदीवरील पुलाखालून जोरदार पाणी वाहत होते. तसेच दैत्यनांदूर येथील शिवाच्या आंब्याच्या नदीला आलेल्या पूरामुळे पुलावरून पाणी वाहू लागले आणि वाहतूक जवळपास एक तास ठप्प झाली होती.

शेतकऱ्यांच्यादृष्टीने ही नैसर्गिक आपत्ती घातक ठरली आहे. वाऱ्यासह पावसामुळे भाजीपाला आणि फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. आंबा, डाळिंब यासारख्या फळपिकांचे फळ गळून पडले असून जनावरांसाठी साठवलेला चारा भिजून नष्ट झाला आहे.ग्रामीण भागात विजेचा पुरवठा खंडित झाला असून प्रशासनाकडून पंचनामे करण्याची मागणी होत आहे. मे महिन्याच्या या काळात असा वादळी पाऊस आणि गारपीट अत्यंत दुर्मीळ असून हवामानातील बदलामुळे शेती व ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या संकटात सापडली आहे. प्रशासनाकडून त्वरित मदत मिळावी, अशी अपेक्षा संपूर्ण तालुक्यातून व्यक्त होत आहे. सोमवारी सकाळी सकाळीच पारनेर तालुक्यातील बहुतांशी भागात आवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पारा खाली आला असला तरी कांदा झाकण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी धावपळ करावी लागली. पारनेर तालुक्याच्या अनेक भागात सोमवारी आवकाळी पावसाने हजेरी लावली. सुपा पारनेर टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, वडगाव सावताळ आणि तिखोल या गावांमध्ये जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे ओढे-नाल्यांना पाणी वाहू लागले. या पावसाने साठवणुकीसाठी ठेवलेल्या कांदा पिकाचे नुकसान झाले. तालुक्याच्या उत्तर भागात सध्या पावसाचा जोर वाढला आहे. यापूर्वी मागील आठवड्यात पारनेर तालुक्यातील काही गावात गारपीट होऊन शेतमालाचे नुकसान झाले होते. त्यानंतर पुन्हा सोमवारी पहाटे भिज पाऊस झाला. यामुळे काढणीला आलेल्या आंबा पिकाचे नुकसान झाले आहे.

**नगरमध्ये पावसाचा शिडकाव**

नगर शहरात सोमवारी पावसाचा शिडकाव झाला. शहर व परिसारात दुपारनंतर ढगाळ वातावरण तयार झाले होते. त्यानंतर वातावरणातील दमटपणा वाढला. रविवारी देखील दुपारनंतर शहरात पावसाचा शिडकाव झाला होता.

## भंडारदरात धुव्वाधार पाऊस मुळा पाणलोटातही हजेरी

होता. त्यामुळे आज मंगळवारी सकाळपर्यंत धरणात नव्याने पाण्याची आवक होण्याची शक्यता आहे. काल सोमवारी सायंकाळपर्यंत झालेल्या पावसाची नोंद अशी (मिमी) भंडारदरा ७, घाटघर १९, पाजरे ११, रतनवाडी १६, वाकी ६, अकोले ३. ११०३९ दलघफू क्षमतेच्या भंडारदरात काल सायंकाळी धरणातील पाणीसाठा ३९१८ दलघफू (३५.४९टक्के) झाला होता. धरणातून २६८० क्युसेकने आवर्तनपोटी पाणी सोडण्यात येत आहे. निळवंडेत १८२३ दलघफू(२१.८९ टक्के)होता. या धरणातून कालव्यांना आवर्तन सुरू आहे.

दरम्यान, कोतूळ वार्ताहराने कळविले की, अवकाळी पावसाने मुळा धरण पाणलोटात काल सायंकाळी ७.३० ते सव्वा आठ वाजेपर्यंत वादळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला आहे.